FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

0154150

फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र, जिल्हा District मुंबई, पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि.मुंबई, पहिली खबर क्र. FIR No. ४२, वर्ष Year २०२१, दिनांक Date १२/१०/२१

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८, कलमे Sections ७
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शोमवार, तारीख पासून Date from २२/८/२०२१ वेळ Time ..........., तारीख पर्यंत Date to १२/१०/२०२१ वेळ Time १०:२५
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date १२/०८/२०२१, वेळ Time ...........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ५१/२०२१, तारीख Date १२/१०/२०२१, वेळ Time २१.१० वा

4. माहितीचा प्रकार Type of Information : लेखी अर्ज, लेखी / तोंडी Written / Oral ...........

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यांपासून अंतर व दिशा ..........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. ...........
   Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ........... Chouki / Beat / O.P. Name and No. ...........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे अंतर्गत पंप हाऊस पोलीस चौकी, बिट क्र.०१, गणपत राणे मार्ग, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३, ठिकाणाचे नंबर No. if any ..........., गल्ली Ward ..........., रस्त्याचे नाव Name of road ...........
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name कालुलाल पटेल
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name देवाजी
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age २० वर्षे
   (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय, फोन नं. Phone No. 9324267519
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ...........
   (f) व्यवसाय Occupation ऑनलाईन लॉटरी
   (g) धर्म Religion हिंदू, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता Address : पाडे चाळ, जिजामाता रोड, पंप हाऊस अंधेरी पूर्व मुंबई - ९३
   गल्ली / सर्व्हे नं. Ward ..........., घर / नाव नं. House/Name No. ..........., फोन / मो. नं. Phone/Mo. No. ..........., पॅन नं. PAN No. ..........., गटर्स नं. Card No. ...........
   रस्त्याचे नाव Road ..........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., पो. स्टे. P Stn. ...........
   तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address: १२४ कराडा की आगल, सोमा खेरा उदयपूर, राज्य - राजस्थान - 313706

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to Case Diary.)
   अमित शामभारती गोसावी, वय - ४२ वर्षे, धंदा नोकरी (बृहन्मुंबई पोलीस दल पद - पो.ना.क्र. ०६००४०, नेमणूक एम.आय.डी.सी. पोलीस ठाणे, मुंबई). रा.ठि. बी/१, रुम नं ७०७, सहयोग को. हौ. सो., मुळगाव डोंगरी, महाकाली गुंफा रोड, अंधेरी पूर्व, मुंबई - ४०००९३

Y.P.P.–800 Reg.–(25×6=150 Lvs.)–2-2018–PA3–(K) 829

Scanned with CamScanner

फिर्यादी कालुलाल देवजी पटेल वय ३० वर्षे, रा. ठि पांडे चाळ, जिजामाता रोड, पंप हाऊस, अंधेरी पूर्व मुंबई-९३ यांनी दिलेली फिर्याद ही स्वतंत्र कागदावर मराठीत संगणीकृत केली असून ती सोबत जोडण्यात आलेली आहे. तिच गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे.

समक्ष

(अमोल वाघमारे)
पोलिस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

कालुलाल पटेल

Scanned with CamScanner

जबाब                                    दिनांक – १३/१०/२०२१

मी, कालुलाल देवाजी पटेल, वय ३० वर्षे, व्यवसाय – लॉटरी व्यवसाय, रा. ठि. पांडे चाळ, जिजामाता रोड, पंप हाऊस, अंधेरी पुर्व, मुंबई, मुळ गावचा पत्ता– देवाजी डांगी, १२७, कराडा की भागल, सोमा खेडा, उदयपुर, राज्य–राजस्थान ३१३७०५. मो.नं. ९३२४२६७५१९

———

मी वरीलप्रमाणे असून वर नमूद पत्यावर माझे कुटुंबियांसह गेल्या दिड वर्षापासून भाडेतत्वावर राहत असून सदर ठिकाणी मी, राजश्री सुपर लॉटरीचे दुकान चालवित आहे. परंतू गेल्या दिड वर्षापासून लॉकडाऊनमुळे सदरचे दुकान बंद होते.

सध्या लॉकडाऊन शिथील झाल्यामुळे मला दुकान पुन्हा चालु करावयाचे होते. सदरचे दुकान मी चालु करणार याबाबत पंपहाऊस चौकीचे हवालदार गोसावी, त्यांना माहिती होताच सन ऑगस्ट २०२१ मध्ये त्यांनी माझ्या दुकानात येऊन तुझे लॉटरीचे दुकान पुन्हा चालु करावयाचे असल्यास प्रतिमहिना त्यांना रुपये ५०००/– दयावे लागतील असे सांगितले. दिनांक २५/०८/२०२१ रोजी ते पुन्हा माझे दुकानावर येवुन माझेकडे ५०००/– रू. ची मागणी करू लागल्यामुळे मी त्यावेळी घाबरुन पोलीस हवालदार गोसावी यांना रु ३,५००/– दिले होतेव राहिलेले १५००/– रू हे नंतर देतो असे सांगितले होते.

त्यानंतर उर्वरीत रक्कम रुपये १५००/– सुध्दा देण्यासाठी पोलीस हवालदार गोसावी हे माझ्याकडे तगादा लावत होते. त्यांना उर्वरीत रक्कम देण्याची माझी इच्छा नसल्याने मी दिनांक १३/०९/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी कार्यालय, मुंबई, येथे तक्रार करण्याकरीता आलो. तेथील वरिष्ठ अधिकारी यांची भेट घेवून त्यांना माझी तक्रार सांगितल्यानंतर माझ्या तक्रारीची दखल घेण्याकरीता पो.नि. वाघमारे तसेच सपोआ कुभार यांची नेमणूक केल्याने मी, पो.नि.वाघमारे यांनी माझ्याकडे तक्रारीबाबत चौकशीकरुन मला तक्रार अर्ज देण्यास सांगितल्याने मी, पो.नि.वाघमारे यांना माझ्या हस्ताक्षरात हिंदी भाषेमध्ये तक्रारअर्ज लिहून दिला.

त्यानंतर पो.नि. वाघमारे यांनी मला मी दिलेल्या तक्रार अर्जाची दि. १३/०९/२०२१ रोजीच पडताळणी करणार असल्याचे सांगून, लागलीच दोन पंचाना पाचारण केले. ते लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे कार्यालयात आल्यानंतर पो.नि. वाघमारे यांनी माझी पंचांबरोबर ओळख करुन दिली. तसेच सपोआ श्री. कुंभार साहेब यांची

समक्ष,
[signature]
( अमोल वाघमारे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

कालुलाल पटेल

Scanned with CamScanner

देखील ओळख करुन देऊन ते सदर प्रकरणात परिवेक्षक अधिकारी म्हणून असणार असल्याचे सांगून माझेकडे लाच मागणारा इसम हा लागलीच लाचेची रक्कम स्विकारणार असल्याने मी, दोन पंच, पो.नि. वाघमारे, स.पो.आ. कुंभार व सापळा पथकातील पोलीस अंमलदार असे आवश्यक त्या साधन सामुग्रीसह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई कार्यालयातून दोन शासकीय वाहनाने एम.आय.डि.सी. अंधेरीच्या दिशेने रवाना झालो व राजमाता जिजाबाई मार्ग विकास पॅराडाईज इमारती समोर आल्यानंतर दोन्ही वाहने थांबली.

त्यानंतर काही वेळाने पो.नि.वाघमारे यांनी मला पुन्हा पोलीस हवालदार गोसावी बसत असलेल्या बीट चौकी ०१ मध्ये पडताळणीकरीता डिजीटल रेकॉर्डर चालू करून शर्टाचे आतील बनियनला लावून पंच श्री. गुल्हाणे यांचे सह पाठविले. दि. १३/०९/२०२१ रोजी सायं ०७.०० वा च्या सुमारास माझी श्री. गोसावी यांची भेट झाली व कामसंदर्भात चर्चा झाली. माझे लॉटरीचे दुकान पुन्हा चालु करण्यासाठी महिना रूपये ५,०००/— दयावे लागतील व या महिन्यातील उर्वरित रक्कम हि एक ते दोन दिवसात देण्यास मला सांगितले. त्यानंतर सपोआ कुंभार व पोनि वाघमारे यांचेशी चर्चा करून श्री गोसावी यांना उर्वरित रक्कम रू. १५००/— हे दि. १५/०९/२०२१ रोजी देण्याचे व त्यावेळी सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर दिनांक १५/०९/२०२१ रोजी ११.०० वा च्या सुमारास पोनि. वाघमारे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे मी सर्व्हिस रोड, पंप हाऊस अंधेरी (पुर्व) मुंबई येथे आलो. त्यानंतर थोडयावेळाने सपोआ कुंभार, पोनि वाघमारे, दोन शासकिय पंच व पोलीस पथक सदर ठिकाणी शासकिय वाहनात आले. त्यानंतर मी, पोनि वाघमारे यांच्या सुचनेवरून श्री. गोसावी हे बीटचौकी ०१ येथे आहेत कि नाही? याची खात्री करण्याकरिता रवाना झालो व काहीवेळाने परत येवून पोनि वाघमारे यांना श्री. गोसावी हे बीटचौकीत उपस्थित नाही असे सांगितले. त्यानंतर पोनि वाघमारे यांनी मला शासकिय वाहनात बसण्यास सांगितले व श्री. गोसावी यांच्या मोबाईलवर फोन करण्यास सांगितले परंतु श्री. गोसावी यांनी माझा फोन घेतला नाही. त्यानंतर आम्ही लाप्रवि कार्यालयात परत आलो. त्यानंतर सपोआ कुंभार व पोनि वाघमारे यांचेशी चर्चा करून श्री गोसावी यांना उर्वरित रक्कम रू. १५००/— हे दि. १६/०९/२०२१ रोजी देण्याचे व त्यावेळी सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले.

समक्ष,

(अमोल वाघमारे),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

कालुलाल पटेल

Scanned with CamScanner

दिनांक १६/०९/२०२१ रोजी पोनि वाघमारे यांच्यासुचने प्रमाणे मी, नान शारदा मार्ग, इंद्रलोक बिल्डिंगसमोर, अंधेरी (पुर्व) या ठिकाणी १०.१५ वा. आलो. सदर ठिकाणी पोनि वाघमारे पंच व पोलीस पथक हजर होते. पोनि वाघमारे यांनी मला श्री. गोसावी हे बीटचौकी येथे हजर आहेत किंवा नाही? तसेच तसेच श्री. गोसावी बीटचौकीमध्ये हजर नसतील तर ते येईपर्यत सदर ठिकाणी थांबावे असे सांगितले असता श्री. गोसावी यांची बीटचौकी जवळ मी फारवेळ वाट पाहुन पुन्हा शासकिय वाहन थांबलेल्या ठिकाणी परत आलो व पोनि वाघमारे यांना श्री. गोसावी बीटचौकी येथे आले नाही म्हणून सांगितले. त्यानंतर पोनि वाघमारे मला शासकिय वाहनात बसण्यास सांगून ते वाहन लाप्रवि कार्यालयाच्या दिशेने घेण्यास चालकास साांगितले व आम्ही लाप्रवि कार्यालयात परत आलो.

त्यानंतर दिनांक १६/०९/२०२१ रोजी सायंकाळी मला माझ्या मोबाईलवर राहत्या गावाहून फोन आला की, माझे लहान चुलते श्री. नंगाराम पटेल यांची तब्येत ठिक नाही. सदरबाबत मी पोनि वाघमारे यांना मोबाईलद्वारे कळविले व दिनांक १८/०९/२०२१ रोजी मी माझे राहते गावी निघुन गेलो. माझे चुलते श्री. नंगाराम पटेल हे दिनांक २४/०९/२०२१ रोजी मयत झाले त्यांची संपूर्ण विधी व धार्मिक कार्यक्रम पूर्ण करून मी दिनांक १०/१०/२०२१ रोजी गावाहुन परत आलो. दिनांक ११/१०/२०२१ रोजी पोनि वाघमारे यांना मी फोन करून गावाहुन परत आल्याचे सांगितले व श्री. गोसावी यांना भेटण्याकरिता जायचे असल्याबाबत सांगितले असता पोनि. वाघमारे यांनी दि. १२/१०/२०२१ रोजी श्री गोसावी यांना उर्वरित रक्कम रू. १५००/– हे देण्याचे व त्यावेळी सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले.

दिनांक १२/१०/२०२१ रोजी पोनि वाघमारे यांच्यासुचने प्रमाणे मी श्री. नान शारदा मार्ग, इंद्रलोक बिल्डिंगसमोर, अंधेरी (पुर्व) या ठिकाणी ११.१० वा. आलो. सदर ठिकाणी पोनि वाघमारे पंच व पोलीस पथक हजर होते. नमूद वेळी पोनि वाघमारे यांनी मला दिलेल्या सुचनाप्रमाणे मी, हवालदार गोसावी हे बीटचौकीमध्ये हजर आहे किंवा नाही याबाबत खात्री करण्याकरिता रवाना झालो. तेथे मी बराच वेळ थांबलो पोलीस हवालदार श्री. गोसावी हे सुमारे १३.४५ वा पर्यत न आल्याने पोनि वाघमारे यांच्याशी संपर्क साधला तेव्हा पोनि वाघमारे यांनी मला परत पोलीस वाहनाजवळ बोलविल्याने मी, पोलीस वाहनाजवळ परत आलो. त्यानंतर सपोआ कुंभार व पोनि वाघमारे यांचेशी चर्चा

समक्ष,
[signature]
( अमोल वाघमारे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

कालुलाल पटेल

Scanned with CamScanner

करून श्री गोसावी यांना उर्वरित रक्कम रू. १५००/— हे दि. १३/१०/२०२१ रोजी देण्याचे व त्यावेळी सापळा कारवाईचे आयोजन करण्याचे ठरविण्यात आले.

त्याप्रमाणे मी आज दिनांक १३/१०/२०२१ रोजी पोनि वाघमारे यांनी मला सकाळी ०८.३० वा फोन करून ०९.३० वा. पर्यंत पश्चिम द्रुतगती महामार्ग, गुंदवली येथील श्री. साईप्रसाद हॉटेलच्या बाजूला असलेल्या लाईफ वजन काटाच्या मोकळया जागेत येण्यास सांगितले त्याप्रमाणे मी सुमारे ०९.४५ वा. सदर ठिकाणी पोहचलो. त्यानंतर पोनि वाघमारे यांनी त्यांचे सोबत असलेल्या शासकिय वाहनात बसण्यास सांगितले. त्यानंतर पोनि वाघमारे यांनी मला अशा सुचना दिल्या की, पोलीस हवालदार श्री.गोसावी बीटचौकीत आहे किंवा कसे याबाबत खात्री करून घेतल्यावरच मला वॉईस रेकॉर्डर लावण्यात येईल, तसेच इतर महत्त्वाच्या सुचना दिल्या त्यानंतर पोनि वाघमारे यांनी एका पोलीस अंमलदारास लाचेसाठी वापरण्यात येणाऱ्या नोटांना ॲथ्रेसिंग पावडर लावण्यास सांगितले त्याप्रमाणे त्यांनी पावडर लावून सदरची रक्कम मी परिधान केलेल्या शर्टच्या डाव्या बाजूस हळूच ठेवली. पोनि वाघमारे यांच्यासुचने प्रमाणे मी, पंच व आमच्या मागोमाग पोलीस पथक कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे बीटचौकीच्या दिशेने निघालो. एमआयडीसी पोलीस ठाणे अंतर्गत बीट क. १, पंप हाऊस, अंधेरी पुर्व, मुंबई येथे आम्ही पोहचलो असता सदर बीट चौकी ही बंद असल्याचे आम्हाला दिसुन आले. त्यानंतर सदर बीट चौकीच्या आजूबाजूस कोणासही संशय येणार नाही अशाप्रकारे पंच व पोलीस पथक उभे राहीले. काहीवेळानंतर श्री.गोसावी बीटचौकीच्या दिशेने मोटार सायकलवरून येताना मला दिसले व त्यांना मी ओळखले. त्यानंतर मी पोनि वाघमारे हे जेथे उभे होते तेथे गेलो व त्यांना पोलीस हवालदार गोसावी बीटचौकीत आले असल्याचे सांगितले. त्यानंतर पोनि वाघमारे यांनी मला पुन्हा सुचना देवून माझ्या शर्टच्या आतील बनियनला वॉईस रेकॉर्ड चालु करून मला पोलीस हवालदार श्री. गोसावी यांना भेटण्यासाठी पंच गुल्हाणे यांच्यासह रवाना केले.

मी बीटचौकीच्या दरवाजातून पाहिले असता श्री. गोसावी हे चौकीत एक टेबला समोर बसले होते. मी, श्री. गोसावी यांची प्रत्यक्ष भेट घेतली व भेटी दरम्यान माझे लॉटरीचे दुकान पुन्हा चालु करण्याबाबत चर्चा करून त्यांना त्यांनी मागणी केलेल्या पाच हजार रूपये पैकी उर्वरित रक्कम दिड हजार रूपये हे त्यांना देण्याकरीता आल्याचे सांगितले असता सदरची रक्कम ही त्यांनी त्यांचे हाताने स्विकारून ती रक्कम घेवुन ते

समक्ष,

(signature)

( अमोल वाघमारे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

कालुलाल पटेल

Scanned with CamScanner

बीट चौकीच्या आतील रूममध्ये निघुन गेले. त्यामूळे त्यांनी स्विकारलेली लाचेची रक्कम कोठे ठेवली हे मी पाहू शकलो नाही. त्यानंतर मी बीट चौकीच्या बाहेर येवून माझ्या तोंडावरील मास्क काढून तो माझ्या शर्टच्या खिशात ठेवून लाचेची रक्कम स्विकारल्याबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला व सदर ठिकाणाहून बाजूला निघून आलो. त्यानंतर मी केलेल्या इशा—यानंतर पोलीस पथक व पोलीस अधिकारी यांनी बीटचौकीमध्ये प्रवेश केला व श्री.गोसावी यांना ताब्यात घेतले. त्यानंतर पोनि वाघमारे माझ्या शर्टच्या आतील बनियला लावलेला व्हाईस रेकॉर्डर बंद केला व ताब्यात घेतला. पोनि वाघमारे यांनी माझ्याकडे चौकशी केली असता मी त्यांना वरिलप्रमाणे हकिकत सांगून लोकसेवकाने लाचेची रक्कम १,५००/— स्विकारल्याचे सांगितले.

त्यानंतर पोनि वाघमारे यांनी श्री. अमित गोसावी यांच्याकडे अधिक चौकशी केली असता लाचेची रक्कम ही बीटचौकीच्या आतील खोलीत असलेल्या हिरव्या रंगाच्या लोखंडी कपाटावर कागदी पुठ्ठा व कापाटाच्या मधोमध ठेवले असलेबाबत सांगितले. त्याप्रमाणे पोनि वाघमारे यांनी पंच गुल्हाणे यांच्या मदतीने कपाटाची वरील बाजू तपासली असता कपाटावरील कागदी पुठ्ठाच्या खाली माझ्याकडून स्विकारलेली लाचेची रक्कम रूपये १,५००/— ( ५०० रूपये दराच्या भारतीय चलनी ०३ नोटा ) मिळून आले. श्री गोसावी यांना पोनि वाघमारे यांनी ताब्यात घेतल्यानंतर त्यांचे नाव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव अमित शामभारती गोसावी वय ४३ वर्षे पद— पोलीस नाईक, नेमणुक— एमआयडीसी पोलीस ठाणे, मुंबई असे असल्याचे मला समजले.

तरी पांडे चाळ, जिजामाता रोड, पंप हाऊस, अंधेरी पुर्व, मुंबई याठिकाणी माझे लॉकडाऊनमुळे बंद असलेले राजश्री लॉटरीचे दुकान पुन्हा चालु करण्यासाठी पोलीस नाईक अमित शामभारती गोसावी वय ४३ वर्षे यांनी माझेकडुन दिनांक १३/०९/२०२१ रोजी रू.५,०००/— लाचेची रक्कमेची मागणी केली व उर्वरित लाचेची रक्कम रू. १,५००/— हे आज दि. १३/१०/२०२१ रोजी सुमारे १०.२५ वा स्वत:साठी स्विकारली म्हणुन माझी त्याचेविरूध्द तक्रार आहे. माझी श्री. अमित शामभारती गोसावी यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझा वरील जबाब मराठीत लॅपटॉपवर टंकलिखीत केली असून तो मला मराठीत वाचून हिंदीतून समजावून सांगितला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरा आहे.

कालुलाल पटेल

समक्ष,

( अमोल वाघमारे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Scanned with CamScanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the Complainant / Informant

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page. नमुद तारीख, वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी त्यांचे जिजामाता रोड, पांडे चाळ, पंप हाऊस, अंधेरी (पूर्व) मुंबई-६९ येथील लॉकडाऊनमुळे बंद असलेले राजश्री सुपर लॉटरीचे दुकान हे पुन्हा चालू करणार आहेत, अशी माहिती मिळताच आलोसे श्री. अमित शामभारती गोसावी यांनी फिर्यादी यांची प्रत्यक्ष भेट घेवून, लॉटरीचे दुकान पुन्हा चालू करण्याकरीता दर महा रु. ५०००/- द्यावे लागतील असे सांगितले, त्यावेळी फिर्यादी यांनी आलोसे यांना दि. २५/८/२०२१ रोजी रु. २५००/- दिले होते. दि. १३/९/२०२१ रोजी केलेल्या पडताळणी मध्ये आलोसे यांनी तक्रारदार यांच्याकडे दर महा रु ५०००/- लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. आज दि. १२/१०/२०२१ नमुद आलोसे यांना तक्रारदार यांच्याकडून लाचेची मागणी केलेली दर महा रु ५०००/- पैकी उर्वरित रु. १५००/- एवढी लाचेची रक्कम स्विकारताना रंगेहात पकडल्याने कलम ७ भ्र.प्र.अधि-१९८८ प्रमाणे गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : ........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)........ Rank........ No........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to........ (3) Transferred to P. S. ........ District........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant / Informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name अमोल वाघमारे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ........
Posting लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अंमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with CamScanner